# ***प्रा. अनंत लांडगे यांना दलित पँथर गौरव पुरस्कार***

लातूर दिनांक १७/१०/२०२३ डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वानानंतर समाजात आत्मभान व चैतन्य आणण्यासाठी दलित पँथर ही लढवय्या संघटना उदयास आली डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्वज्ञान शिरोधार्थ मानून समाजाचा स्वाभीमान बलवत्तर करण्याचा प्रयत्न दलित पँथरने केला. अन्याय अत्याचार करणाऱ्यावर वचक बसविण्याचा प्रयत्न केला. दलित तरुणांचे जबरदस्त संघटन करुन या संघटनेने दलित समाजात आपले स्थान निर्माण केले. याच दलित पँथर संघटनेत निस्वार्थी भावनेने, त्यागी भुमिकेतून, कसलीच अभिलाषा न बाळगता आपलं आयुष्य दलित पँथरच्या झंझावती चळवळीला अर्पीत केलेले व सध्याही आंबेडकरी चळवळीत जोमाने कार्य करणारे प्रा. अनंत लांडगे यांना औरंगाबाद येथील भव्य कार्यक्रमात ***दलित पँथर गौरव पुरस्कार*** देवून गौरविण्यात आलेले आहे.

दलित पँथर संयोजन समिती २०२३ औरंगबादच्या वतीने ***त्याग आणि समर्णपणाला अभिवादन*** म्हणून दलित पँथर सुवर्ण महोत्सव याचे औचित्य साधून हा पुरस्कार सोहळा औरंगाबद येथे आयोजित केला होता. केंद्रीय सामाजीक न्याय राज्यमंत्री तथा रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडियाचे रार्ष्टीय अध्यक्ष मा.ना.रामदासजी आठवले साहेब यांच्या हस्ते व रिपाइं राज्य अध्यक्ष राजाभाऊ सरवदे, राज्य सचिव चंद्रकांतदादा चित्ते, कार्यक्रमाचे अध्यक्ष बाबुरावजी कदम व मुख्य संयोजक नागराज गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार प्रा. अनंत लांडगे यांना देण्यात आला. पँथर प्रा. अनंत लांडगे यांना ***दलित पँथर गौरव पुरस्कार*** देवून सन्मानीत केल्याबद्दल बलभिमराव कोर्थीबीरे, प्राचार्य अनिल गायकवाड, रमेश श्रृंगारे, प्रा. एस.टी. चांदेगावकर, प्राचार्य विजय श्रृंगारे, प्राचार्य एस.टी. मस्के, ए.आर. लामतुरे, भारती लामतुरे यांनी अभिनंदन केले आहे.

***आपला विश्वासू***

***प्राचार्य विजय श्रृंगारे***